नवप्रभा
तरुणाई
शनिवार, दि. ५ मार्च २०१६

नवप्रभा - ५|३|२०१६.

भाषादिनाच्या निमित्ताने...

पौर्णिमा केरकर

“हरी नारायण आपटेंनी मातृभाषेविषयी विचार व्यक्त करताना सांगितले आहे- 'मातृभाषेचा अभिमान आपण धरला पाहिजे. तो ज्यांनी धरला, त्याच्या अभिमानामुळेच मराठी भाषेला अर्थसमर्थता आली आहे. इतकी की वाटेल ते शिक्षण तिच्याद्वारे देता येईल. वाटेल तो विचार तिच्याद्वारे उच्चारता येईल व वाटेल तसे मनोरंजनही तिच्या द्वारे करता येईल'. सारांश... वाङ्मयाचे सर्व हेतू सिद्ध करण्याइतके तिच्या अंगी सामर्थ्य आले आहे. त्या सामर्थ्याचा उपयोग आपण करून तिला अधिक समर्थ करणे हे आपल्या हातात आहे.'

निमित्त होतं २७ फेब्रुवारी जागतिक भाषादिनाचे! भाषादिन म्हटल्यानंतर तमाम मराठी मनाना आठवतात् ते आपले तात्यासाहेब शिरवाडकर ऊर्फ कवी कुसुमाग्रज. उत्तुंग प्रतिभाशक्ती - भव्यत्व दिव्यत्वाचा शोध घेणारे हे कवीमन माणुसकीने ओतप्रोत भरलेले होते. याच दिनाचे औचित्य साधून दोडामार्ग तालुक्यातील लक्ष्मीबाई हळबे महाविद्यालयात कुसुमाग्रज आणि मंगेश पाडगावकर यांच्या स्मृतींना आदरांजली वाहणारा छोटासाच पण नेटका कार्यक्रम आयोजित केला होता. गोवा व कर्नाटकच्या सीमांना जोडलेल्या महाराष्ट्रातील अगदी टोकाचा तालुका म्हणजे दोडामार्ग. भूगर्भशास्त्रज्ञांना अचंबित करणारा कसईनाथाचा पर्वत हे या परिसराचे भूषण आहे. नैसर्गिक, सांस्कृतिक, सामाजिकतेचा प्रगल्भ वारसा मिरविणाऱ्या या परिसराचे सांस्कृतिकदृष्ट्या गोवा व कर्नाटकाशी बंध अनुबंध जुळलेले आहेत. अशा या तालुक्यात खेड्यापाड्यातून शिक्षणासाठी पायपीट करणाऱ्या असंख्य युवामनाना शैक्षणिक आधार दिला तो लक्ष्मीबाई हळबे महाविद्यालयाने! 'ज्या देशात माणसे घडविण्याचा विचार केला जातो, त्या देशाचा वर्तमान नेहमीच कृतीशील, प्रगत आणि विधायक आशावादी असते', अशा सकारात्मक विचारसरणीने प्रेरित झालेल्या महाविद्यालयाची स्थापना ही ग्रामीण भागातील विद्यार्थीवर्गासाठी - त्यांच्या सांस्कृतिक, शैक्षणिक उत्रयंनासाठी महत्त्वपूर्ण ठरलेली आहे. दुर्गम भागातून शिक्षणाच्या ओढीने येणारे विद्यार्थी, तळमळीने ज्ञानदान करणारा शिक्षक वर्ग, समस्यांना सोबतीला घेऊन, त्यावर मात करून, सर्वांकडून कामे करवून घेणारे प्राचार्य अशा एकमेकांच्या साहचर्यातून इथला शिक्षणप्रवास सुरू आहे.

महाविद्यालये ही नुसतीच माहितीची वास्तू न होता ती कृतीशील प्रवाही आपुलकीच्या आणि संशोधनाच्या वाटा धुंडाळणारी केंद्रे व्हायला हवीत... हा विचार मनात रुजवून या संस्थेने विद्यार्थ्यांकडून लोकसाहित्याच्या

संशोधनात्मक संकलनाचे काम करून घेतले. प्राथमिक स्तरावर राबविण्यात आलेल्या या उपक्रमाला शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांचेही उत्स्फूर्त सहकार्य लाभले. त्यातूनच आकारास आले 'लोकवेद - दोडामार्ग तालुक्यातील लोकसाहित्य' हे संग्राह्य असे पुस्तक! प्राचार्य डॉ. व्ही.ए. पाटील यांच्या संकल्पनेतून कार्यरत झालेला हा प्रकल्प. विद्यार्थी ज्या ज्या गावातून येतात त्या गावातील त्याच बरोबरीने शेजारच्या गावातील लोककलाकारांच्या जाणत्यांशी संवाद साधत... जात्यावरील ओवी, फुगडी, धालोगीते, शिमगोत्सवाची, शेतावरची गाणी, प्रतिकात्मक गाऱ्हाणी, म्हणी, उखाणी यांचे केलेले हे संकलन आहे. महाराष्ट्रासारखे भौगोलिकदृष्ट्या आकाराने मोठ्या असलेल्या या प्रदेशाला लोकसाहित्याच्या संशोधनाचा, अभ्यासाचा प्रगल्भ असा वारसा लाभलेला आहे. दुर्गा भागवत, रा.चि.ढेरे ही फक्त प्रतिकात्मक नावे आहेत. लोकसाहित्याच्या या क्षेत्रात अभ्यास सहजपणे झाला नाही अशी अनेक गावे, तालुके असतील. दोडामार्ग हा अगदी टोकाचा तालुका असल्याने इथल्या लोकवेदाचे भांडार तसे उपेक्षितच राहिले परंतु हळबे महाविद्यालयाचे या पुस्तकाच्या माध्यमातून या संशोधनात्मक कामाची सुरुवात केली आहे- त्यामुळे पुढचा मार्ग सुकर झालेला आहे. २६ फेब्रुवारीला भाषादिनाचे औचित्य साधून गोवा व महाराष्ट्रातील मान्यवर साहित्यिकांच्या उपस्थितीत या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी संस्थेचे संचालक साहित्यिक डॉ. अभिजीत हेगशेट्ये उपस्थित होते.

लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी
जाहली खरेच धन्य ऐकतो मराठी
धर्म, पंथ, जात एक जाणतो मराठी
एवढ्या जगात माय मानतो मराठी

या सुरेश भटांच्या कवितेच्या ओळींनी वातावरण निर्मिती झालेल्या एका भारलेल्या क्षणी कुसुमाग्रज आणि मंगेश पाडगावकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. डॉ. कृष्णाजी कुलकर्णी यांचे 'मराठी भाषेची थोरवी' सांगणारे विचार, संगीता अरवूने मुंबई, चित्रा क्षीरसागर, दीपा मिरींगकर, प्रकाश क्षीरसागर, [illegible] सादर केलेले कविसंमेलन, असे कार्यक्रमाचे स्वरूप असलेला हा उपक्रम मातृभाषेची महती विद्यार्थी मनात रुजविण्यासाठी यशस्वी ठरला.

मातृभाषेत अभिमान धरून त्यांच्याशी सुसंगत विचारसरणी होणे ही काळाची गरज आहे. आपल्यातील जाणिवा विकसीत करण्यासाठी साहित्य गरजेचे आहे. जाणिवा संवेदना जागृती करण्यासाठी भाषा किती महत्त्वाची आहे याचे विवेचन करताना मराठी भाषेला कोणताही धोका नाही असे सकारात्मक उद्‌गार कृष्णाजी कुलकर्णींनी आपल्या ओघवत्या शैलीतून बोलताना व्यक्त केले. कविसंमेलनात तर सर्वच कवींनी आपल्या कविता सादर करून काव्यसंमेलन अधिक रंगतदार केले. संचालक अभिजित हेगशेट्ये यांनी लोकसाहित्यावरील संशोधनात्मक पुस्तक प्रकाशित करून एक ऐतिहासिक दस्ताऐवज निर्माण केल्याबद्दल प्राचार्य-शिक्षक वर्गाचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या मनात स्वभाषेची प्रौढी रुजविण्यास अशा उपक्रमाची नितांत गरज आहे. भाषा मनामनाना जोडण्याचे काम करते. माणसामाणसातील नाती वृद्धींगत करते. लोकमानसाने तर लोकगीतातून मातीचा गंध असलेली लोकभाषा मनांमनांत रुजविली. ती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचे काम महाविद्यालयाने प्राचार्य पाटील सरांच्या मार्गदर्शनाखाली, संस्थेचे अध्यक्ष श्रीपाद हळबे यांच्या प्रेरणेने, प्रा. दीपक बर्वे, शेट्ये व इतर सहकारी शिक्षकांच्या सहकार्याने पार पाडले. भाषादिनाचा हा उपक्रम एका अभिनव पद्धतीने या महाविद्यालयाने साजरा केला. हरी नारायण आपटेंनी मातृभाषेविषयी विचार व्यक्त करताना सांगितले आहे- 'मातृभाषेचा अभिमान आपण धरला पाहिजे. तो ज्यांनी धरला, त्याच्या अभिमानामुळेच मराठी भाषेला अर्थसमर्थता आली आहे. इतकी की वाटेल ते शिक्षण तिच्याद्वारे देता येईल. वाटेल तो विचार तिच्याद्वारे उच्चारता येईल व वाटेल तसे मनोरंजनही तिच्या द्वारे करता येईल'. सारांश... वाङ्मयाचे सर्व हेतू सिद्ध करण्याइतके तिच्या अंगी सामर्थ्य आले आहे. त्या सामर्थ्याचा उपयोग आपण करून तिला अधिक समर्थ करणे हे आपल्या हातात आहे.' भाषादिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांच्या हृदयात स्वभाषेविषयीचा दीप प्रज्वलीत करण्याचा या महाविद्यालयाचा स्तुत्य उपक्रम होता.